# अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील बंडखोर स्त्री

सुप्रिया थोरात, संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर .

..................................................................................................................

महाराष्ट्रात अनेक थोर विचारवंत, आणि थोर साहित्यिक होवून गेले, त्याच्या विचाराने आणि साहित्याने समाजात अनेक बदल घडून येण्यास मदत झाली. त्याच्या विचाराने आणि साहित्याच्या माध्यमातून समाजाला नवनवीन विचारांचा उपदेशांचा वारसा मिळाला. त्याच्या साह्याने समाजातील पूर्वापार चालत आलेल्या जून्या रूढी-परंपरा यांना मागे टाकण्याचे काम साहित्याच्या माध्यमातून केले. अनेक साहित्यिकांनी जनप्रबोधनाचे कार्य आपल्या साहित्यातून केले त्यापैकी मराठीतील थोर साहित्यिक अण्णा भाऊ साठे यांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून समाजात एक नवी जागृती घडवून आणण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. अज्ञानात डांबून ठेवलेल्या लोकांना समाजप्रबोधनाच्या माध्यमातून 'माणूस' बनविण्याचा खराखुरा प्रयत्न केला. आणि आपले आयुष्य समाज सुधारणा करण्यात घालवले. विशेषत: अण्णा भाऊंनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून समाजाच्या प्रत्येक घटकाला स्पर्श केल्याचे दिसते, परंतू त्यांनी त्यांच्या साहित्यातून 'स्त्री' यांना विशेष स्थान दिले आहे.

प्राचीन काळापासून स्त्रीला समाजात दुय्यम स्थान देण्यात आले आहे. मनुस्मृती मध्ये जर 'न स्त्री स्वातंत्र्य महेती' स्त्रीला कोणत्या प्रकारचे स्वातंत्र्य नाही तिला फक्त गुलामाप्रमाणे वागणूक दिली जायची, चुल व मुल ही दोनच तिची कर्तव्य आहे असे तिच्यावर लादले होते परंतु ''स्त्रीयांना गुलाम करणारी, स्त्रीला शुद्र ठरविणारी, आणि अशा या पारंपारिक हिंदु समाजव्यवस्थेत जगत नव्हे, तर मरत असलेल्या स्त्रियांची बाजू अण्णा भाऊंनी घेतली. गुलामी, कनिष्ठत्व आणि अस्पृश्यत्व नाकारणारी अण्णा भाऊंची लेखणी मग स्त्री स्वातंत्र्याचा जयघोष करीत मनुचे एक एक वचन खोडू लागली. अण्णा भाऊंनी स्त्री स्वातंत्र्याचा जाहीरनामाच आपल्या साहित्यातून मांडला आहे.'' (सकटे मच्छिंद्र १४८, १४९) अण्णा भाऊंनी आपल्या साहित्यात कथा-कादंबरीमधून स्त्रियांचे चित्रण एक लढाऊ बंडखोर आणि नवविचार प्रधान असलेल्या स्त्रियांचे चित्र रेखाटले आहे.

अण्णाा भाऊंनी समाजातील एकुण सर्व स्तरातील स्त्रियांचे चित्रण मांडले आहे. तळागाळातील झोपडपट्टीत राहून काम करून जगणारी स्त्री, कामगार जीवन जगणारी, वेश्या व्यवसाय करणारी, मुरळी तमाशा कलावंत, उच्च कुळातील स्त्री, दारिद्रयात पिचत पडलेली स्त्री, सुंदर रूपवान स्त्री, विधवा स्त्री, क्रांतिकारी लढ्यात उतरणारी स्त्री इ. प्रकारच्या स्त्रीयांचे वेगळे जग मांडणाऱ्या आणि स्त्री समस्यांच्या यातुन पेटुन उठणाऱ्या बंडखोर नायिका यांचे चित्र अण्णा भाऊंनी मांडले आहे.

अण्णा भाऊंच्या एकुण चाळीस कादांबरीपैकी स्त्री विषय विचार मांडणाऱ्या कादंबऱ्या, चित्रा, वैजयंता, चंदन, चिखलातील कमळ, फुलपाखरू, आवडी, रत्ना, तारा, मंगला, रूपा, संघर्ष, माकडीचा माळ, पाझर, अहंकार इ. कादंबरीचे लेखन स्त्री समस्या आणि त्या समस्यांना तोंड देण्याची स्त्रीयांची वृत्ती यांचे चित्रण या कादंबऱ्यातून मांडले आहे.

**वैजयंता :** ही कादंबरी तमाशा क्षेत्रातील स्त्री कलावंत यांच्या जीवनावर प्रकाश टाकते. पारपारिक लोककला तमाशा यावर आधारित आपल्या जीवनाचा उदरनिर्वाह करून जगणाऱ्या वैजयंता व तिची आई गजरा यांचे जीवन मांडले आहे. गजराबाई ही तमाशामध्ये काम करत असते. एकेकाळी तिच्या नृत्याचे सर्वांना वेडलावले होते, तिला वैजयंता ही सुंदर मुलगी असते. आपल्या वाट्याला जे दु:ख, भोग आले आहेत ते वैजयंताच्या वाट्याला येवू नये म्हणून ती वैजयंताला तमाशापासून दूर ठेवते परंतु गजराची तुलना चंद्राबरोबर झाल्यानंतर ती चंद्रापुढे कमी ठरते व गजराचा अपमान होतो या अपमानाचा बदला घेण्यासाठी ती वैजयंताला तमाशात नाचवण्याचा निश्चय करून तीला तमाशात उभी करते व चंद्रा या नर्तिकेचा पराभव वैजयंता कडून करते. गजराच्या शेजारी राहणारे जोती व हौसा या दांपत्याचा मुलगा उमा हा वैजयंताचा मित्र असतो. त्या दोघांचे एकमेकांवर लहानपणापासून प्रेम असते. गजराला उमा आपला जावई व्हावा अशी इच्छा असते, पण जोती गजराला या नात्याबद्दल विरोध करतो, नकार देतो. या नकारामुळे वैजयंता पुढे तमाशात नाचायला सुरूवात करते आपल्या प्रियकराचे मन डावलते.

तमाशातील कंत्राटदार चंदुलाल याला वैजंयताचे वेड लागते तो तिच्या चारित्र्यावर हात टाकण्याचा प्रयत्न करतो पण वैजयंता त्याच्या जाळ्यात सापडत नाही. चंदुलालच्या या वाईट प्रवृत्तीला अनेक स्त्रीया बळी पडलेल्या असतात पण वैजंयता या प्रवृत्तीला बळी पडत नाही त्याचा हेतू लक्षात घेवून ती वेळीच सावधान होते. त्याला विरोध करते आणि नाचणे सोडून देवून ती धुणे-भांडी करून स्वाभीमाने साधे सरळ जीवन जगते. ''जनता कलेची कदर करत नाही म्हणून तिलाा खुप दु:ख होते. 'जनतेची मालकी कलेवर असते शरीरावर नाही', असे बोलून ति स्त्रिकडे पाहण्याचा व्यापक दृष्टीकोन समाजाला दाखवते आणि या कला प्रकारातून बाहेर पडून उमाबरोबर लग्न करून आपला संसार उभा करते.समाजातील कामांध झालेले चंदुलाला सारखे दृष्ट प्रवृत्तीच्या माणसाचे चित्रण मांडले आहे. परंतु या वाईट प्रवृत्तीच्या कंत्राटदाराना बळी न पडता आपले शील संरक्षण करून होणाऱ्या आर्थिक, शारिरीक शोषणा पासून आपला बचाव करते पारंपारिक लोक प्रकारातील अन्यायाला विरोध करून वैजयंता स्वाभिमानाने जगते. अशी पुरोगामी विचारांची वैजयंता अण्णा भाऊंनी या कादंबरीतून चित्रित केली आहे.

**आवडी :** ही कादंबरी उच्च कुळातील स्त्री व्यक्तिरेखा आवडी. हीच्या जीवनावर आधारित मांडणी केलेली आहे. तांदुळवाडीस रघु चौगुले या खानदानी कुंटुबातील आवडी अत्यंत देखणी असते. संपूर्ण तांदुळवाडीचा परिसर तिच्या देखण्यापणाबद्दल चर्चा करत असत. अशावेळी तिच्या वडीलांना ही एवढी देखणी मुलगी कोणाच्या घरात द्यावी हा प्रश्नच पडला होता. पाटीलकी असल्याने गावातील व गावाबाहेरच्या सर्व लोकांची वाड्यावर वर्दळ असायची. ह्यातच बोरगावचा धनाजी रामोशी या व्यक्तीवर आवडीचे प्रेम बसते पण ही गोष्ट त्यांच्या घरच्यांना

खटकते आणि तिचा भाऊ नागु हा एका दिवसात तिचे लग्न ठरवतो आणि लावून देतो. आवडी बोरगावच्या भगवान पाटीलाची सून होते. पण आवडीच्या नवऱ्याला फेफरे येत असतात तिची फसवणूक झालेली असते हे तिला जेव्हा समजते तेव्हा ती शांत बसत नाही तर ती यातून सुटण्याचा मार्ग शोधते आणि एके दिवशी जातीने हलक्या असणाऱ्या धनाजी रामोशी याच्याशी पळून जाते. धर्म आणि संस्कृतीच्या विरोधात जावून ती बंड करते. तिच्यावर लादलेला जोरजबरदस्तीचे नाते ती मान्य करत नाही. दिल्या घरी किंवा व्याह्या घरी मरावे ही समाजाची रूढ मागे टाकून ती आपल्या स्वत:साठी तिसरी जागा शोधते, पण आपल्यावर लादलेल्या अन्यायकारक बंधनात ती 'पिचत पडत नही तर समाजाच्या या बंधनातून मुक्‍. होते धनाजी बरोबर आपल्या प्रियकराबरोबर झोपडीत सुखाचा संसार थाटते परंपरागत लादले जाणारे जीवन नाकारते आणि मुक्त स्वातंत्र्य जीवन जगते अशी नवीन विचारांची व जातीभेदाच्या भिंती नष्ट करणारी आवडी अण्णा भाऊंनी या कादंबरीतून मांडली आहे.

समाजातील धर्म जात संस्कृती या नावाखाली आणि घरंदाज कुटुंबातील कन्या पुरूषांच्या हेकेखोर प्रवृत्तीमुळे घरातील सुंदर सालस मुलीच्या जीवनाचा कसा चुराडा होतो याचे चित्रण आवडी या व्यक्तिरेखेतून दिसते. घराण्याच्या अब्रुसाठी स्वत:वर होणारा अन्याय तिला दिसतो आणि स्त्रीला गुलाम करू पाहणाऱ्या या संस्कृतीच्या विरोधात बंड करून, परंपरागत व्यवस्था अमान्य करून आंतरजातीय विवाह करणारी आवडी सर्वार्थाने वेगळी वाटते अशी पुरोगामी विचारांची बंडखोर विचारांच्या आवडीचे माळवादी विचारांचे प्रतिबिंब या कादंबरीतून दिसून येतात.

**चित्रा :** चित्रा ही कादंबरी भांडवली जगातील भिषण वास्तवता व वेश्या व्यवसायाचे भेसुर चित्रण अत्यंत गंभीरपणे व त्यामध्ये अडकलेली चित्रा व सोना यांच्या जीवनाचे चित्रण मांडलेले आहे.

पतिनिधनानंतर सखुबाई आपल्या चित्रा व सोना या दोन मुलींसह भावाकडे येऊन राहते. गरिब परिस्थितीच्या कारणाने ती भावाकडे राहते पण या गरिबीचा फायदा कशा मामा कृष्णा होतो. सोनाचे लग्न लावून देतो परंतु रोगीमाणसाबरोबर लग्न लावून दिल्याने तो इतक्या देखण्या मुलाला ठेवून होण्यास नकार देवून तीला सोडून देतो. यातून मार्ग काढण्यासाठी पून्हा सोनाचे लग्न करण्याचे सांगून तिला मुंबईला नेतो आणि मुंबईतील वेश्या व्यवसाय करणाऱ्या कुंटण खाण्यात विकतो आणि तिच्या मिळणाऱ्या पैशातून आपण ऐशोआरामात गावाकडे राहतो. सर्व पैसा आपल्या कुटुंबावर खर्च करते मात्र इकडे सखुबाई व चित्रा मात्र गरिबीत आपले जीवन घालवत असतात पुढे चित्राचे ही लग्न लावून देतो परंतु चित्रा नवरा गोम कानात शिरल्यामुळे मरतो, पून्हा चित्राचा ही संसार उद्ध्वस्त होतो.सोनाप्रमाणे चित्राला ही मुंबईत आणतो पण सोनाने अनुभवलेले भोग हे चित्राच्या वाट्याला येवू नयेत म्हणून ती या दुनियेपासून तीला लांब ठेवते तरी सुद्धा तेथील लोक चित्रावर हात टाकण्याचा प्रयत्न करतात पण चित्रा सापडत नाही. ''जीवाच्या मोलानं अब्रु जपा'' या आईने दिलेल्या शिकवणीनुसार ती वेश्या व्यवसायातील धन, दौलत, अव्हेरून प्रयत्नपूर्वक आपल्या शीलाचे रक्षण करते. जन्मापासून दु:ख भोगतात पण शील रक्षण करून प्रतिष्टेने चित्रा जगते. पुरोगामी विचारांचा जया तिला भेटतो त्यांच्याशी लग्न करून झोपडपट्टीत राहते, अन्याय सहन करून घेत नाही स्वाभिमानाने जगते.

या कादंबरीमध्ये भांडवली जगातील भिषण वास्तवतेचे चित्रण दाखवले आहे. भांडवलशाही च्या मदतीने मुंबई शहराचे औद्योगिकीकरण होत होते. औद्योगिकीकरणाच्या परिणामध्ये फायदे-तोटे समाजावर होत होते. मुंबईत बेजबाबदार लोक आणि लैंगिक आकर्षण यामुळे एकिकडे वेश्या व्यवसाय वाढत होता यामध्ये कोणी स्वत:च्या मर्जीने यात येत होते, तर कुणाला जबरदस्तीने हा व्यवसाय स्वीकारावा लागत होते. समाजामध्ये वैश्यावृत्ती का वाढते ? त्याचे मुळ कारण काय आहे ? या वृत्तीचे गुन्हेगार कोण ? यात किती निष्पाप बळी गेले ? हा संशोधनाचा विषय आहे पण भुकबळी, गरिबी, मोहाचे पाश अनुभवलेल्या असहायतेच्या थपडा सहन केलेल्या अण्णा भाऊंच्या तरूण स्त्रीयांच्या व्यथांचे चित्रण चित्राच्या माध्यमातून केले आहे.कोणतीही स्त्री स्वत:हून या व्यवसायात येत नसून तिला तिची भोवतालची परिस्थिती, दारिद्रय, औद्योगिकीकरण यांच्या वाढत्या भस्मासुरामुळे बळी पडतात याचे चित्र अण्णा भाऊंनी समाजासमोर मांडले आहे.

**चंदन :** या कादंबरीमध्ये मुंबईतील झोपडपट्टीत राहणारी स्त्री कामगार आपल्या पतीच्या निधनानंतर तिच्यावव आलेली संकटे आणि त्या येणाऱ्या संकटाला धैर्याने सामोरे जावून संकटांवर मात केलेल्या स्त्रीचे चित्रण अण्णा भाऊंनी या कादंबरीतून मांडले आहे. चंदन ही एका गरिब सर्वसामान्य कुटुंबातील असून तिचे आई-वडील लहानपणीत गेल्याने तिचा सांभाळ तिचा मामा करतो. वयाच्या बाराव्या वर्षी माणगावातील जगूशी तिचा विवाह होतो. दोघेही कष्ट करून जगण्यासाठी मुंबईला येतात त्यांना एक मुलगा होतो. एके दिवशी अचानक जगु बेपता होतो आणि चंदनावर दु:खाचा डोंगर कोसळतो. ती दु:खाला बाजुला सारून स्वत:चे व मुलगा राजा याचे पोट भरण्यासाठी शोधते आणि एका कंपनीत कामाला लागते. दयाराम कंपनीत कामाला सुरूवात केल्यापासून तेथील कंपनीचा मालक याची नजर चंदनवर पडते आणि तो चंदनवर हात टाकण्याचा प्रयत्न करतो पण चंदन ही आपले शील आणि चारित्र्य यांना महत्त्व देणारी स्वाभिमानी स्त्री असून ती अब्रु लुटण्यासाठी आलेल्या दयारामच्या तोंडावर ॲसिडचा डबा ओतते आणि आपले संरक्षण करते परंतु यात तीला दोन वर्षाची शिक्षा होते. ती शिक्षा भोगते पण आपल्यावर कोणताही अन्याय होवू देत नाही. समाजातील वाईट प्रवृत्तीचा ती विरोध करून हिंसक प्रतिकाराचा बंडखोर मार्ग स्वीकारते अशी बंडखोर क्रांतिकारी विचारांची कामगार जीवन जगणारी चंदन ही स्त्री अण्णा भाऊंनी या कादंबरीतून मांडली आहे.

विधवा स्त्रियाकडे पाहण्याची समाजाची प्रवृत्ती किती वाईट असते. विधवा, बेसहारा, लाचार स्त्रियांना समाज सरळ मार्गाने जगू देत नाही. त्याच्या अब्रुवर घाला घालण्याचा प्रयत्न करत असतात आणि त्यांच्या गरिबीचा फायदा घेतात. दयाराम सारखे अनेक वाईट प्रवृत्तीची

माणसे समाजामध्ये असताना दिसून येतात परंतु चंदन बेसहारा आहे म्हणून कोणत्याही प्रकारचा अन्याय सहन करून घेत नाही. होणाऱ्या अन्याया विरूद्ध ती प्रतिकार करते कसल्याही प्रकारची ती तडजोड करत नाही असे बंडखोर विचारक या कादंबरीतून दिसून येतात.

**फुलपाखरू :** या कादंबरीतून रोहिणी या तरूणीला गुन्हेगारी प्रवृत्तीतील दोन मुले ग्यान व दिलीप यांनी नोकरी लावतो म्हणून रोहिणीला फसवून नेतात. नोकरीचे व पैशाचे खोटे अमिष दाखवून तिला मुंबईला नेऊन वेश्या व्यवसाय करायला भाग पाडतात. तिच्या मनाच्या विरोधात तिच्या देहाचा बाजार मांडून पैसे कमावतात. पण तिथेच शेजारी राहणारा राजा नावाच्या मुलाशी तिचे प्रेम जमते. तिचा सर्व भूतकाळ जाणून सुद्धा राजा तिच्याशी लग्न करतो. वेश्या असून सुद्धा तिचा स्वीकार करून या घाणीतून तिला बाहेर काढतो पुरोगामी विचारांचा राजा रोहिणीचे जीवन सफळ करतो आणि त्या दोघांना त्यांच्या कर्माची फळे भोगायला तुरुंगात पाठवतो याचे चित्रण अण्णा भाऊंनी या कादंबरीतून मांडले आहे. पण रोहिणीच्या वाट्याला आलेल्या नरक यातना त्याला तोंड देवून परिस्थितीवर मात कशी मात करते याचे चित्र रेखाटले आहे.समाजामध्ये प्रत्येक व्यक्तीला त्याच्या घरातील किंवा घराबाहेरील एक वातावरण असते जो ज्या वातावरणात विचारात राहत असतो तो त्याच पद्धतीचा विचार करत असतो आणि त्याप्रमाणे वागत असतो. याच फळ प्रवृत्तीचे उदाहरण म्हणजे दिलीप व ग्यान हे दोघे ज्या विचार प्रवाहात राहत होते त्याच प्रकारची वृत्ती त्यांनी रोहिणीच्या जीवनात केलेली असते म्हणजे प्रत्येक व्यक्तीला घडण्याकरिता समाजाच्या योग्य मार्गदर्शनाची गरज असे हे या कादंबरीतून दिसून येते.

**चिखलातील कमळ :** ही कादंबरी समजातील प्रचलित असणारी रूढी-परंपरा वाघ्या व मुरळी यांच्या जीवनावर आधारीत आहे. मुरळीवर होणारा सामाजिक अन्याय मांडणारी व्यथा या कादंबरीतून अण्णा भाऊंनी मांडले आहे.

भारतीय समाजव्यवस्थेने दलितांच्या वाट्याला जे भोगवटे दिले आहेत त्यातील एक देवदासी आणि मुरळी सोडण्याची अनिष्ट प्रथा कि जिच्या नावाखाली गरिबांचे लैंगिक शोषण करण्याची प्रथा पूर्वपरंपरागत असून या धार्मिक प्रथेचे दुष्परिणाम आणि स्त्रीचे केले जाणारे शोषण या मुलभूत समस्येवर अण्णा भाऊंनी या कादंबरीमध्ये मांडणी केलेली आहे.

तुळसा व तिची मुलगी सीता या दोघींच्या वाट्याला आलेले मुरळी जीवन याची मांडणी या कादंबरीतून केलेली आहे. तुळसा ही अत्यंत देखणी मुरळी हिचे वेड टोपच्या मुरारराव पाटलांना लागते. तिला गावात घर बांधून देतात आणि तुळसाला मुरारराव पाटलांपासून सीता होते. पाटील आजारी पडतात त्यावेळी तुळसा खंडोबाला नवस बोलते, पाटीलांची तब्येत बरी होवू दे, मला मुलगी झालीतर तुला वाहीन यावर पाटील बरे होतात. सीता मोठी होते एके दिवशी अचानक पालटाची दोन्ही पोरं आजारी पडतात. त्यावेळी लव्हाजी व वाघ्या स्वार्थी प्रवृत्तीचा असतो. तो तुळसाला तिच्या नवसाबद्दल आठवण करून देतो. त्याची इच्छाच असते की सीताने त्याच्या बरोबर पार्टीत काम करावे म्हणजे त्याला भरभराटी होईल या संधीचा फायदा घेऊन तो पाटीलाच्या बायकोला सावित्रीबाईंना या नवसा बद्दल सांगून तुळसाने सीताला मुरळी सोडावी म्हणून डाव रचतो. त्याच्या खोट्या सांगण्यावर विश्वास ठेवून सीतेला मुरळी म्हणून खंडोबावर सोडतात. सीता सर्व खोऱ्यात प्रसिद्ध होते त्यातच तिची ओळख बळीशी होते ती प्रेमात पडते बऱ्याच गावचे पाटील सीतावर फिदा असतात पण ती कोणालाही जवळ येवू देत नाही. अनेक गावगुंडापासून बळी सीताचा बचाव देखील करतो. लव्हाजीचा आखलेला खोटा बेत सीताला कळतो त्यावेळी तिला देखील या व्यवस्थेतून बाहेर पडावे वाटते आमि सर्वसामान्य जीवन जगता यावे यासाठी ती बळीशी लग्न करते आणि समाजाने लादलेल्या अन्यायकारी प्रथेतून बाहेर पडते तिला ही या बरबटले चिखलातून बाहेर पडावेसे वाटते आणि ती चिखलातून कसे स्वच्छ कमळ उमलते जद्वत ती या प्रथेतून बाहेर पडते याचे चित्र अण्णा भाऊंनी मांडले आहे. समाजाने लादलेली पारंपारिक देवदासी रूढी ही तुळसाने भोगली पण मार्क्सवादी क्रांतीकारी विचारांची सीता या पारंपारिक प्रथेला विरोध करून आपले स्वतंत्र्य आणि मुक्त जीवन जगणे पसंद करते आणि या गुलामगिरीच्या प्रथेला विरोध करून यातून बाहेर पडते.समाजातील प्रचलित असणाऱ्या अनिष्ट प्रथा परंपरा धर्म व्यवस्था यांच्या विरोधात बंड करणारी बंडखोर नायिका सीताचे वर्णन केले आहे. स्वार्थासाठी उपभोगणारा लव्हाजी याचा बेत उलथवून लावणारी क्रांतीकारी विचारांची सीता याचे क्रांतीकारी विचार मांडले आहेत.अण्णा भाऊंनी अनेक बंडखोर स्त्रियांचे चित्रण आपल्या कादंबरीतून केलेले आहे. मंगला ही देशाच्या स्वातंत्र्य चळवळीत आपल्या प्रियकराच्या बरोबरीने लढते भावाच्या विरोधात उभी राहते या मंगलाचे क्रांती विचार अण्णा भाऊंनी मांडले आहेत. तसेच माकडीचा माळ या कादंबरीतील दुर्गा अत्यंत देखणी मुलगी असते तिच्यावर गावच्या इनामदाराची नजर पडते पण दुर्गा आपली अब्रू हातातील बांगडीसारखी आहे हे मनात ठेवऊन आपल्या शीलाचे रक्षण करते आणि आपल्या लहानपणीचा मित्र येमू बरोबर लग्न करते असे विविध स्त्री रूपाचे चित्रण अण्णा भाऊंनी मांडले आहेत.

**समारोप :** अण्णा भाऊंनी आपल्या साहित्यामध्ये स्त्रीविषयक विविध विचार मांडून, चित्रित करून कादंबरीतील जग उपेक्षित, सामान्य स्त्रीचे आहे. हे जग पूर्ण वेगळे असून त्यास केंद्रवती स्थान दिलेले आहे. त्यांच्या कादंबरीतील नायिका समाजजीवनातून निर्माण होणाऱ्या समस्यांना सामोरे जाणाऱ्या आहेत, स्त्री सुलभ जीवन जगता यावे यासाठी धडपडणाऱ्या आहेत आणि पारंपारिक पद्धतीला छेद देऊन स्वत:चे भावविश्व निर्माण करणाऱ्या मनस्वी नायिका आहेत.

**संदर्भ :**

१.गायकवाड शरद : प्रबोधन प्रकाशन ज्योती, २०१२.

२.गुरव बाबुराव, लोक वाङ्मयग्रह, मुंबई, समाजविचार आणि साहित्य विवेचन, २०१०.

३ .मोरे गिरिष : (संपा) परिवर्तनाचा जागर, २०१३.

४.सकटे मच्छिंद्र : अण्णा भाऊ साठे एक सत्यशोधक प्रज्ञा प्रकाशन, कोल्हापूर, २००५